(20)

Inward No. 3692
Received on 26/6/2026
Asstt. Superintendent

Exh.5/C
Order
Seen & Filed.

3rd Jt C.J.J.D., Kolhapur.

Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.07.21 16:54:57 +0530

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, न्यायालय क्र. 3 यांच्या न्यायालयात**

**किरकोळ फौजदारी अर्ज नं. 854 /2026**

वि.प.-1(महाराष्ट्र सरकार) तर्फे
**श्री. वि, शि. गुजर**
अन्न सुरक्षा अधिकारी
अन्न व औषध प्रशासन ,म. राज्य कोल्हापूर--------- अर्जदार

विरुद्ध

**श्रीमती अश्विनी संदिप सूर्यवंशी**
धंदा-व्यवसाय, रा.उद्यमनगर कोल्हापूर ,
**कोल्हापूर** ................. गैरअर्जदार

**वि.प.-1(महाराष्ट्र सरकार) तर्फे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन , म. राज्य कोल्हापूर सविनय सादर करतात ते पुढील प्रमाणे**

सविनय सादर करण्यात येते की, अर्जदार अन्न सुरक्षा अधिकारी या पदावर सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म.राज्य, कोल्हापूर यांच्या कार्यालयात दिनांक १६/०६/२०२५ पासून कार्यरत आहेत. अन्न सुरक्षा व मानदे कायदा 2006 च्या कलम 36 (1) नुसार अर्जदार यांची "अन्न सुरक्षा अधिकारी" या पदावर नेमणूक झाली असून, सदरची नियुक्ती महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक १०/०२/२०२६ द्वारे प्रसिद्ध झाली आहे. सदर धारिका अर्जदार यांना कार्यभारात माहे जून २०२६ मध्ये प्राप्त झाली. सदर प्रकरणात, महाराष्ट्र सरकार तर्फे अन्न सुरक्षा व मानदे कायद्याच्या तरतुदींनुसार तत्कालीन अन्न सुरक्षा अधिकारी श्री ग.म.कदम यांना प्रदान असलेल्या कायदेशीर शक्ती अन्वये दिनांक ०९/०६/२०२६ रोजी, श्रीमती **अश्विनी संदिप सुर्यवंशी** यांच्या मालकीच्या **मे.तिरुमला किरणा मॉल न १३२५/२८, ई वार्ड, जान्हवी टी शॉप जवळ, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर** येथील पेढीची तपासणी केली. त्यावेळी सदर पेढीत **श्री.ओमकार मानसिंग पाटील (वय ३२)** हे विक्रेता म्हणुन हजर होते व त्या पेढीमधून महाराष्ट्र राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त यांनी सार्वजनिक आरोग्याच्या हिताने जारी केलेला **प्रतिबंध आदेश क्रमांक असुमाका/अधिसुचना/४११/२०२५/७ दिनांक १६/०७/२०२५ नुसार लोक आरोग्य हितास्तव**

**महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित केलेले** गुटखा, पान मसाला, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू,स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, आपमिश्रके युक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू, खर्रा, मावा ईत्यादी पैकी सुगंधीत तंबाखू सुगंधित सुपारी मिश्रित मावा हे प्रतिबंधित अन्न पदार्थ छुप्या विक्रीकरता साठविलेले आढळून आले. हजर विक्रेता हे स्वत: प्रतिबंध केलेले वरीलप्रमाणे पदार्थ पेढीत बाळगून लोकांना विकत होते. म्हणून सदर पेढी सील करून, **श्री. ओमकार मानसिंग पाटील यांचेसह** प्रकरणाची संपुर्ण चौकशी होण्याकरिता पोलिस ठाणे, राजारामपुरी कोल्हापूर येथे प्रथम खबरी अहवाल हजर केला आहे. त्यानुसार पोलिस ठाणे राजारामपुरी कोल्हापूर यांनी गुन्हा र. नं. **346/2026** अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**श्रीमती अश्विनी संदिप सूर्यवंशी** यांनी त्यांच्या किरकोळ अर्ज क्र. 854/2026 दाखल दि.09/07/2026 व कार्यालयास प्राप्त दि. 13/07/0/20264 मध्ये नमुद केलेल्या मुद्दयांची खालीलप्रमाणे म्हणणे मांडण्यात येत आहे.

1) सदर प्रकरणात नमुद पेढीमध्ये खाद्यपदार्थासोबत इतर प्रतिबंधित असलेले तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ विक्री होत असल्याचे आढळुन आले. यांचे प्रतिबंधित आदेश क्रमांक असुमाका/अधिसुचना/४११/२०२५/७ दिनांक १६/०७/२०२५ अन्वये महाराष्ट्र राज्यात गुटखा, पानमसाला किंवा अंतिमत: गुटखा किंवा पानमसाला गठीत होउ शकेल असा पदार्थ, सुगंधित किंवा स्वादिष्ट सुपारी/तंबाखु इत्यादीचे उत्पादन/साठा/ वितरण/वाहतुक/तसेच विक्री यावर बंदी घातलेली आहे. सदर आदेशानुसार अशा ठिकाणी अन्नपदार्थांची विक्री होत असल्यास देण्यात आलेला अन्नपरवाना /नोंदणी रद्द करण्यात येईल. तसेच व्यावसायिकावर अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे कलम 31 नुसार कारवाई केली जाईल.
2) सदर प्रकरणातील पेढीकडे अन्नपदार्थ विक्रीसाठी लागणारा नोंदणी उपलब्ध असल्याची आढळून आली. सदर अन्न व्यवसायासाठीचे उपरोक्त ठिकाणचे अन्न सुरक्षा नोंदणी प्रमाणपत्र क्र २१५२६०४२०००२२६ मुदत दिनांक १५/०२/२०२७ हे जन आरोग्याच्या हिताचे दृष्टीने (In the interest of Public Health) सहायक आयुक्त अन्न कोल्हापूर यांनी रद्द केले आहे.
3) मा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म. राज्य यांचे ज्ञापन क्र असुका/प्र.अ./कयोचि/344-17/07 दि. 06/04/2017 नुसार प्रतिबंधित अन्नपदार्थांची वाहतुक अथवा विक्री/साठा करणाऱ्या आस्थापना सील करुन पुढील कारवाई करण्याचे आदेश अन्न सुरक्षा अधिकारी यांना देण्यात आले आहेत.
4) सदर पेढी ही लोक वर्दळीच्या चौकामध्ये, मुख्य बाजारपेठेत गर्दीच्या ठिकाणी आहे आणि सदर ठिकाणाहून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले पदार्थ या पुढे सुद्धा विक्री होण्याची दाट शक्यता आहे. तसेच सदर हजर व्यक्ती **श्री. ओमकार मानसिंग पाटील** यांनी पुढील तपासकामी कोणतीही मदत केली नाही. उडवाउडवीची उत्तरे दिली असल्याने व सार्वजनिक जन आरोग्य हितार्थ सदर पेढी खुली करण्यात येवु नये असे माझे मत आहे.

5) सदर प्रकरणातील प्रतिबंधित पदार्थांच्या पुरवठादाराबाबत विचारणा केली असता, **श्री. ओमकार मानसिंग पाटील** यांनी त्याचे खरेदी बील उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे. तसेच गैरअर्जदार यांनी महाराष्ट्र शासनाने राज्यभरात गुटखा, पान मसाला, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी,आपमिश्रके युक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू, खर्रा,मावा या स्वरुपात किंवा अन्य कोणतीही नावाने संबोधले जाणारे अन्न पदार्थाचे उत्पादन, साठा, वितरण व विक्री करण्यास बंदी असल्याबाबत पूर्ण कल्पना असल्याचे मान्य केले आहे.

6) आज अखेर सदर प्रकरणातील गैरअर्जदार तथा आरोपी यांनी प्रकरणातील प्रतिबंधित केलेले पदार्थ पेढीतून विक्रीकरिता कुणी पुरवठा केला, त्याचे खरेदी बिल किंवा अन्य कसलाच तपशील सादर केलेला नाही.

7) सदर पेढी सील करण्यापूर्वी गैरअर्जदार यांना त्यांच्या पेढीत विक्रीसाठी साठा केलेली नाशवंत बेकरी उत्पादने,बिस्किट,गोळया वगेरे  अन्न पदार्थ पेढीच्या बाहेर घेण्याची सूचना केलेली होती.

## प्रार्थना

वरील प्रमाणे मुद्देनिहाय म्हणणे, वि.प. (महाराष्ट्र सरकार) तर्फे अन्न सुरक्षा अधिकारी हे सादर करीत आहेत. अर्जदार व अन्न सुरक्षा अधिकारी, यांची मेहरबान न्यायालयास विनंती आहे की, गैरअर्जदार यांचा अर्ज खारीज होवून जनआरोग्य हितास्तव गैरअर्जदार यांची सदर पेढी खुली करण्यात येवू नये.

**ठिकाण**:-मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर न्यायालय क्र.३ यांचे न्यायालयात.
**दिनांक**:- 15/07/2026

वि.प. -1 (महाराष्ट्र सरकार) तर्फे अर्जदार

**(वि. शि. गुजर )**
अन्न सुरक्षा अधिकारी
अन्न व औषध प्रशासन , म. राज्य कोल्हापूर